SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103
Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/चव्हाण/1008 दि. 11.03.2019

# परिपत्रक

आपणास विदीत आहेच की, सतराव्या लोकसभा निवडणुकीच्या तारखा दि. 10 मार्च 2019 रोजी जाहिर झालेल्या आहेत. शिवाजी विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालयाच्या परिक्षेत्रामध्ये दि. 23 एप्रिल 2019 रोजी मतदान तारीख जाहिर झालेली आहे. सदर दिवशी विद्यापीठाच्या काही अभ्यासक्रमाच्या परीक्षा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे सदर दिवशी असणा–या परीक्षांचे नियोजन/वेळापत्रक बदलणे अपरिहार्य आहे. तसेच शिवाजी विद्यापीठ व परिक्षेत्रातील महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची लोकसभा निवडणुकीकरीता मतदान अधिकारी म्हणून निवडणुक आयोगाकडून नियुक्ती केली जाते. त्यामुळे नियुक्त केलेल्या मतदान अधिका–यांना मतदानाच्या एक दिवस अगोदर, मतदान तारीख व त्यानंतर दुस–या दिवशी त्यांच्या मुळ आस्थापनेवर हजर राहता येत नाही. त्यामुळे दि. 22, 23 व 24 एप्रिल 2019 रोजी परीक्षा आयोजित करणे संयुक्तिक होणार नाही. त्याअनुषंगाने आपणास कळविणेत येते की,

1. लोकसभा निवडणुकीच्या कारणाने दि. 22, 23, व 24 एप्रिल2019 रोजी विद्यापीठाची कोणतीही परीक्षा आयोजित करण्यात येणार नाहीत.
2. दि. 22, 23, व 24 एप्रिल 2019 तारखेस काही परीक्षा असल्यास सदर कालावधीतील परीक्षा ज्या त्या वेळापत्रकाच्या शेवटी आयोजित करण्यात येतील.
3. दि. 22, 23, व 24 एप्रिल 2019 तारखेस परीक्षा प्रारंभ होत असल्यास सदर परीक्षा दि. 25 एप्रिल 2019 पासून प्रारंभ करण्यात येईल.

तरी सदरचे परिपत्रक सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

D/RVC/Other/SUB